**Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education,**
**Kolhapur Divisional Board, Kolhapur - 416004**
**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर - ४१६००४.**

Phones : Chairman 2690829 Secretary 2691405 PBX-2696101,2696102,2696103 FAX:[0231]2690758
E-Mail: divsec.kop@gmail.com Web : sscboardkolhapur.in

क्र.कोविमं/उ.मा./परीक्षा/ 2999
दिनांक :- 25/01/2023

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
जिल्हा सातारा, सांगली, कोल्हापूर

**विषय : इयत्ता 12 वी फेब्रुवारी/मार्च 2023 परीक्षा आरोग्य व शारिरीक शिक्षण (30) आणि जलसुरक्षा आणि पर्यावरण (31) विषयाच्या श्रेणी तक्त्यांबाबत...**

उच्च माध्यमिक (इ.12 वी) प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी/मार्च-2023 परीक्षेसाठी आपल्या कनिष्ठ महाविद्यालयामार्फत प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आरोग्य व शारिरीक शिक्षण (Health & Physical Education) (30) आणि जलसुरक्षा आणि पर्यावरण (Jal Suraksha & Environment Education) (31) या श्रेणी विषयाचे श्रेणी तक्ते ( OMR Grade List) सोबत देण्यात आलेले आहेत. श्रेणी तक्ते भरण्यासंदर्भातील सूचना पुढीलप्रमाणे-

श्रेणी तक्ते OMR पध्दतीने अंकामध्ये Numeric Code मध्येच भरावयाचे आहेत.

| प्राप्त गुण / Marks | द्यावयाची श्रेणी / Grade |
|---|---|
| 34 टक्के आणि त्यापेक्षा कमी | 0 |
| 35 ते 44 टक्के | 1 |
| 45 ते 59 टक्के | 2 |
| 60 टक्के आणि त्यापेक्षा अधिक | 3 |
| यापूर्वीच्या परीक्षेस सूट मिळालेले विद्यार्थी | 4 |
| दिव्यांग विद्यार्थी | 5 |
| गैरहजर विद्यार्थी | A |
| फेब्रुवारी/मार्च 2015 परीक्षेपुर्वी इ.12 वी परीक्षेस प्रविष्ठ होवून अनुत्तीर्ण झालेल्या पुन:प्रविष्ठ विद्यार्थ्यांसाठी आरोग्य व शारिरीक शिक्षण (Health & Physical Education) (30) या विषयासाठी | N (Subject Not Offered) |

1. सदर ग्रेड लिस्ट स्कॅनिंग करण्यात येत असलेमुळे ग्रेड लिस्टची मूळ प्रतच मंडळात जमा करावी, झेरॉक्स कॉपी जमा करु नये. तसेच ग्रेड लिस्ट मध्ये नोंदी करणेकरिता गडद निळा किंवा काळ्या बॉलपॉईंट पेनचा वापर करावा. व्हाईटनरचा वापर किंवा खाडाखोड करु नये. स्टॅपलर मारु नये.
2. ग्रेड लिस्ट मध्ये नोंदी केल्यानंतर मंडळाने ग्रेड लिस्ट सोबत दिलेल्या खाकी पाकीटामध्येच सिलबंद करुन वितरण केंद्र प्रतिनिधींकडे विहीत दिनांकास जमा कराव्यात. (ग्रेड लिस्ट तोंडी किंवा प्रात्यक्षिक परीक्षेच्या पाकीटामध्ये जमा करु नये.)
3. श्रेणीसुधार (Class Improvement) अंतर्गत पुन:प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी फेब्रुवारी /मार्च 2022 या परीक्षेत पर्यावरण या विषयासाठी मिळालेले गुण नोंदवावयाचे आहेत. या विद्यार्थ्यांना श्रेणी नोंद करावयाची नाही.
4. श्रेणींची नोंद OMR लिस्ट मध्ये बिनचुक नोंदी करावयाच्या असून त्यासंदर्भातील अधिक माहिती श्रेणी तक्त्याच्या शेवटी NOTE या शिर्षकाखाली देण्यात आलेली आहे.
5. **गैरहजरसाठी A आणि 34 टक्क्यापेक्षा कमी गुणसाठी "0" या ग्रेडच्या नोंदी लाल शाईनेच करण्यात याव्यात. सदर श्रेणींची नोंद करताना त्यासंदर्भात पूर्ण शहानिशा करुनच नंतरच तशी श्रेणी नोंद करण्यात यावी. केवळ श्रेणी विषयास गैरहजर A किंवा नापास 0 अशी श्रेणी मिळाल्याने विद्यार्थी लेखी परीक्षेस उत्तीर्ण असूनही त्याचा निकाल अनुत्तीर्ण म्हणून जाहीर होऊ शकतो. अशाप्रकरणी निकालानंतर श्रेणी मध्ये कोणतीही दुरुस्ती केली जाणार नाही आणि याबाबत सर्वस्वी जबाबदारी कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांची राहील याची नोंद घ्यावी.**
6. दिव्यांग (जे विद्यार्थी प्रत्यक्ष क्रिडांगणावर परीक्षा देण्यास असमर्थ ठरत आहेत असे) विद्यार्थ्यांसाठी "5" अशी श्रेणी देताना त्याला दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सवलती मिळणेबाबतचा विहीत प्रस्ताव वेळेत या कार्यालयाकडे सादर करणे आवश्यक आहे.
7. नियमानुसार आवेदनपत्रे रद्द करण्यासाठी या कार्यालयाकडे शिफारस केलेल्या विद्यार्थ्यांसाठीच फक्त NC अशी नोंद करावयाची आहे.
8. **सदर ग्रेड लिस्ट अचूक व विहीत मुदतीत मंडळ कार्यालयास प्राप्त न झाल्यास विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या शैक्षणिक नुकसानीस सर्वस्वी आपण जबाबदार राहाल याची नोंद घ्यावी.**
9. ज्या विद्यार्थ्यांनी विशेष अतिविलंबाने परीक्षेचे आवेदनपत्र मंडळास सादर केलेली आहेत. परंतु त्या विद्यार्थ्याची ग्रेड लिस्ट मध्ये बैठक क्रमांकाची छापील नोंद नसेल तर अशा विद्यार्थ्याची माहिती मंडळास सादर करताना कॉलेजच्या लेटरहेडवरती विषय, बैठक क्रमांक, श्रेणी अशी नोंद करुन त्या पत्रावरती प्राचार्य व विषय शिक्षक यांची स्वाक्षरी घेऊन सदर पत्र ग्रेड लिस्टच्या पाकिटामध्येच घालावयाचे आहे.

**(डी.एस.पोवार)**
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**